शनिवार, दि. २४ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २८८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## परतूर शहरातील अतिक्रमण तात्काळ काढा

### मुख्याधिकाऱ्यांना आमदार लोणीकर यांनी दिले आदेश

**परतूर । प्रतिनिधी -** १७६ गाव वॉटर ग्रीड व ९५ गाव वॉटर बीड मधील गेल्या तीन महिन्यापूर्वी मुंबई येथे झालेल्या सदस्य सचिव यांच्या दालनात झालीय बैठकीमध्ये, प्रत्येक गावात सुरळीत पाणीपुरवठा करण्याची हमी अधीक्षक अभियंता कार्यकारी अभियंता यांनी दिली होती मात्र अद्यापही ते गावांना पाणी देऊ शकलेले नाहीत या प्रश्नावरून आमदार बबनराव लोणीकर हे कार्यकारी अभियंता यांच्यावर चांगलेच संतापले व अल्टीमेटम देत सुरळीत पाणीपुरवठा न झाल्यास होणाऱ्या कारवाईला सामोरे जा असा सज्जड दम यावेळी त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या अधिकाऱ्यांना दिला

७०० कोटी रुपये खर्च करून आपण मंत्री असताना राज्यातील सर्वात मोठी वॉटर ग्रीड परतुर विधानसभा मतदारसंघांमध्ये आणली मात्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या लाचखोर अधिकाऱ्यांमुळे अद्यापही योजनेचे पाणी संपूर्णतः मतदारसंघात पोहोचले नसल्याने आमदार बबनराव लोणीकर यांनी अधिकाऱ्यांनी होणाऱ्या परिणामास तयार रहा असा गर्भित इशारा दिला

वाळू धोरणाच्या संदर्भामध्ये बोलताना ते म्हणाले की, आपण परतूर मंठा विधानसभा मतदारसंघांमध्ये १५००० च्या



वर घरकुल मंजूर केलेली असून त्यात प्रधानमंत्री आवास योजना यशवंतराव चव्हाण घरकुल योजना, अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास योजना, शबरी आवास योजना आधी आवास योजनांचा समावेश असून, या गोरगरीब घरकुलधारकांना घर बांधण्यासाठी वाळू मिळत नव्हती या पार्श्वभूमीवर आपण राज्य सरकारच्या ही गोष्ट लक्षात आणून दिल्यानंतर घरकुलाला मोफत वाळूचे धोरण सरकारने अमलात आणले असून मतदार संघातील घरकुलांसाठी वाळू उपलब्ध करून देण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांनी प्रत्येक गावातील लाभार्थ्यांच्या याद्या तहसीलदारांना सुपूर्द कराव्यात अशीही यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

यावेळी परतूर नगरपालिकेच्या प्रशासनाला धारेवर धरताना, स्वच्छतेच्या प्रश्नावर आक्रमक होत गाव व मोंढा भागात तुंबलेल्या नाल्या , रस्त्यावर आलेले घाण , हे स्वच्छता निरीक्षकांना दिसत नाही काय असावा उपस्थित करीत पावसाळापूर्व नालेसफाई होणे आवश्यक होते मात्र असे न केल्यामुळे शहरातील प्रत्येक भागामध्ये दुर्गंधी पसरलेली असून , शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे या कामात दिरंगाई करणाऱ्या विभाग प्रमुखावर कारवाई करण्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला

पारधी वाडा परिसर साठे नगरचा काही भाग, वडारवाडी आदी भागांमध्ये गेल्या अनेक वर्षापासून वास्तव्यास असणाऱ्या गोरगरीब नागरिकांना घरपट्टी पाणीपट्टी भरूनही काबीज जमिनीवर घरकुलाचा लाभ मिळालेला नसून या संदर्भामध्ये मुख्याधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही करत या गोरगरीब सर्वसामान्य नागरिकांना घरकुलाचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी असे यावेळी मुख्य अधिकाऱ्यांना आदेशित केले

गुंठेवारीचा प्रश्न तात्काळ सोडवण्यासाठी येत्या चार दिवसांमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये बैठक लावणार असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर श्री शताब्दी वर्षानिमित्त ग्रामीण भागातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रत्येक ग्रामपंचायत अंतर्गत दोन महिलांना सन्मानित करण्यासाठी सामाजिक राजकीय शैक्षणिक सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांची निवड केली जाणार असून निवड झालेल्या महिलांना परतूर येथे प्रशस्तीपत्र व पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचेही **पान ३ वर**

## जनतेच्या हितासाठी सर्वतोपरी प्रयत्न - मंत्री संजय सावकार

### भाजप पदाधिकाऱ्यांशी संवाद



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे हे जालना दौऱ्यावर होते. या निमित्ताने त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यालयात भाजपच्या जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद बैठक संपन्न झाली. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व जयंतीनिमित्त सुरु असलेल्या उपक्रमाबाबत मार्गदर्शन केले.

या बैठकीत पक्षाच्या संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांच्या अडचणी, स्थानिक पातळीवरील विकासकामे, तसेच जालना जिल्ह्यातील वस्त्रोद्योग क्षेत्रातील संधी आणि आव्हानांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विकासाचा प्रत्येक भाग हा कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागातूनच शक्य आहे. सरकार आपल्या सोबत असून, जनतेच्या हितासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

या प्रसंगी भाजप महानगर जिल्हाध्यक्षांनी बोलताना म्हणाले की, अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त विविध उपक्रम पक्षाच्या वतीने सुरु आहेत, अहिल्याबाई होळकर यांनी जनतेच्या कल्याणासाठी केलेले कार्य, न्यायनिष्ठा आणि सत्तेचा लोकहितासाठी वापर, हे आजच्या काळातही प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यशैलीचा आदर्श घेऊनच आपण कार्यकर्त्यांनी समाजात आपले योगदान द्यावे. तसेच आपल्या पक्षाचे बळ हे कार्यकर्त्यांच्या निष्ठेवर आणि लोकांच्या विश्वासावर उभे आहे. मत मांडा व पक्ष वाढवा ही आपली भूमिका असून, प्रत्येक कार्यकर्ता मतदारांपर्यंत पक्षाच्या धोरणांची माहिती पोहोचवण्यासाठी सदैव तत्पर राहिला पाहिजे.

जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पक्षवाढ ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून ती एक सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने गावपातळीवर पक्षाची सेवा करताना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करावा. विकास आणि विश्वास हे आपल्या कार्याचे सूत्र असले पाहिजे.

यावेळी रामेश्वर भांदरगे, विजय कामड, विमलताई आगलावे, बद्रीनाथ पठाडे, अशोक पांगारकर, देविदास कुचे, सतीश जाधव, सुनील आर्दड, **पान ३ वर**

युवा आदर्श

### नशीबथोर ...

दोष नसे मुळी जरी
बिघडे सिबल स्कोर
घिरट्या घाले बँकेत
बळीराजा तुझा पोर
कारणे देऊनि चोख
बँका होती बिन घोर
अवकाळी झोडपतो
लावलायं नवीन घोर
बुडवूनि मोठ्ठी कर्जे
परदेशी पळाले चोर
बोट लावणे अशक्य
नशीब किती ते थोर
कायद्याची पळवाट
जाहीर दिवाळखोर
सेटलमेंटचा सन्मार्ग
स्विकारी कर्जेखोर
कॉम्प्रोमाईझ करती
समस्त चोरावर मोर
राईट ऑफ मोठमोठे
लुटता डोळ्यांसमोर
लवकर येणारदेशात
वाट पाहतात चकोर
हिसकावी गरिबांची
कशी भाकरचतकोर
बळीराजा गळ्यामधे
अडकवी फाशी दोर
पाहवेना उपाशी पोर
सुटला तर नशीबथोर

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## धुळे विश्रामगृह रोकड प्रकरणी ईडीने पुढाकार घेऊन कारवाई करावी- गोरंट्याल

### अर्जुन खोतकरांची आमदारकी रद्द करण्यासाठी निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** धुळे येथील शासकीय विश्रामगृहात सापडलेल्या रोकड प्रकरणी आमदार अर्जुन खोतकर आणि त्यांचे स्वीय सहाय्यक किशोर पाटील यांच्यावर मनी लॉन्ड्रींगचा गुन्हे दाखल करा अशी मागणी जालन्याचे काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी केली आहे. गोरंट्याल यांनी जालना जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे. त्यांनतर ते माध्यमांशी बोलत होते.

धुळे विश्रामगृह रोकड प्रकरणात ईडीने पुढाकार घेऊन कारवाई करावी अशी मागणी गोरंट्याल यांनी यावेळी केली. किशोर पाटील हे अर्जून खोतकर यांचे वसुली करणारे पीए आहेत. त्यामुळे किशोर पाटील यांची नार्कोटेस्ट **पान ३ वर**

## हरियाना सरकारच्या धर्तीवर निवृत्ती वेतन मंजूर करा

### अन्यथा स्वातंत्र्य दिनापासून आंदोलन करणार - बाबासाहेब कोलते

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांच्या वारस मुला मुलींना हरियाणा सरकारच्या धर्तीवर निवृत्तीवेतन मंजूर करून नामनिर्देशित पाल्यांना शासन सेवेत १९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे समावेश करून घेण्यात यावे अन्यथा स्वातंत्र्य दिनापासून १५ ऑगस्ट महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा ईशारा स्वातंत्र्य सैनिक पाल्य समितीचे प्रदेश अध्यक्ष बाबासाहेब पाटील कोलते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एका निवेदनाद्वारे दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनात बाबासाहेब कोलते यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिक व वारस पत्नी मयत झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना तसेच त्यांच्या मुलामुलींना हरियाणा सरकारच्या धर्तीवर निवृत्तीवेतन मंजूर करावे कारण भारत देशातील हरियाणा सरकारने राज्यातील मयत झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या वारस मुलामुलींना दि. १५ जुलै २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करून निवृत्तीवेतन सुरु केले आहे त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलामुलींना निवृत्तीवेतन मंजूर करावे.

केंद्र व राज्यशासनाने स्वातंत्र्य सैनिक मयत झाल्यानंतर त्यांना मिळणारे निवृत्तीवेतन शासनाकडून नियमानुसार बंद होते परंतु मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याची नव्या पिढीला आठवण राहावी व थोर स्वातंत्र्य सैनिकांचा इतिहास हा त्यांच्या वारस मुला मुलींना कळावात्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबातील एका वारसांना निवृत्तीवेतन वारसाने मंजूर करावे. तसेच महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य गेल्या अनेक दिवसापासून शासनाने नोकर भरतीचा शासन निर्णयच रद्द केल्यामुळे गेल्या अनेक दिवसापासून वंचित आहे. त्यामुळे स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्यावर अन्याय झाला आहे.

त्यामुळे नोकरी पासून वंचित असलेल्या नामनिर्देशित पाल्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना शासन सेवेत समावून घेण्यासाठी तात्काळ शासन निर्णय निर्गमित करून नामनिर्देशित पाल्यांना १९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे शासन सेवेत सामावून घेण्यात यावे, याबाबत स्वातंत्र्य सैनिक पाल्य समितीच्या वतीने अनेक वेळेस निवेदने केली आहे परंतु राज्यशासनाने याबाबत कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्यामुळे स्वातंत्र्य दिनापासून १५ ऑगस्टपासून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर स्वातंत्र्य सैनिक पाल्य समितीच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा स्वातंत्र्य सैनिक पाल्य समितीचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब कोलते यांनी दिला आहे.

### सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव

## शिवकालीन दुर्मिळ शस्त्र प्रदर्शनातून छत्रपतींच्या पराक्रमाचे सजीव दर्शन!

**फोंडा, गोवा -** सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवलेनगरी, फोंडा येथे पार पडलेल्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'त शिवकालीन ऐतिहासिक आणि दुर्मिळ शस्त्रांचे भव्य प्रदर्शन धर्मप्रेमींसाठी विशेष आकर्षण ठरले. ६ हजार चौरसफुट क्षेत्रात मांडण्यात आलेल्या या आगळ्या-वेगळ्या प्रदर्शनाने छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर संभाजी महाराजांच्या पराक्रमाचे सजीव चित्र उभे केले. ३० हजारांहून अधिक धर्मप्रेमी नागरिक, तसेच संत, महंत आणि आध्यात्मिक मार्गदर्शकांच्या उपस्थितीत झालेल्या या महोत्सवात शिवकालीन शौर्य, पराक्रम आणि बलिदान यांची आठवण प्रत्येकाच्या मनात ठसठशीतपणे कोरली गेली.

प्रदर्शनात कोल्हापूरच्या सव्यासाची गुरुकुलम आणि पुण्याच्या शिवाई संस्थान यांचे शस्त्रप्रदर्शन, गोव्यातील सौंदेकर घराण्याची प्राचीन शस्त्रे, तसेच सरदार येसाजी कंक यांची तलवार आणि सरदार कान्होजी जेधे यांचे चिलखत प्रमुख आकर्षण ठरले. त्यात सर्वात हृदयस्पर्शी ठरले ते छत्रपती संभाजी महाराजांना औरंगजेबाने बंदिस्त करताना वापरलेले मूळ साखळदंड, जे शिवले कुटुंबाने पिढ्यान्पिढ्या जतन केले आहेत. या साखळदंडांचे प्रथमच सार्वजनिक दर्शन याच महोत्सवात झाले.



या प्रसंगी शिवले कुटुंबातील वंशज सर्वश्री सागर शिवले, कुमार शिवले, सोमनाथ शिवले, दीपक टाकळकर आणि वेदांत शिवले यांचा हिंदु जनजागृती समितीचे पूर्वोत्तर भारताचे धर्मप्रचारक सद्गुरु नीलेश सिंगबाळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या वेळी श्री. कुमार शिवले म्हणाले, राजांच्या बलिदानातून प्रेरणा घेऊन समाजात धर्मप्रेम जागवण्यासाठी हे प्रदर्शन आयोजित केले गेले आहे.

प्रदर्शनात शिवकालीन युद्धकलेत वापरण्यात येणारी दुर्मिळ शस्त्रे - **पान ३ वर**

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी राज्यशासन सर्वतोपरी सहकार्य करेल

### वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांची ग्वाही

**जालना । प्रतिनिधी -** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्रात विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर, जालना शहरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारण्यात येत आहे .या स्मारकामुळे जालना शहर पर्यटन आणि सांस्कृतिक केंद्र म्हणूनही ओळखले जाईल, या स्मारकासाठी शासन स्तरावर सर्वतोपरी सहकार्य केले जाईल अशी ग्वाही वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी दिली.

जालन शहरातील अंबड चौफुली परिसरात उभारण्यात येत असलेल्या 'हिंदूधर्मरक्षिका महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकाची वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी पाहणी केली. या प्रसंगी आमदार नारायण कुचे, भास्कर आबा दानवे, बद्रीनाथ पठाडे, भगवान मात्रे, स्मारक समितीचे अध्यक्ष कपील दहेकर, सचिव शांतीलाल बनसोडे, कोषाध्यक्ष बालासाहेब अबुज, सदस्य तुकाराम कोल्हे, एस. एस. दहेकर, प्रा. गणेश गुंजाळ, साहित्यिक पंडित तळेगावकर, कुरधने सर, काळे साहेब यांच्यासह विविध समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री संजय सावकारे म्हणाले, जालना शहराचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा समृद्ध करणारे २४ फूट उंचीचे हे स्मारक देशातील सर्वात उंच अहिल्यादेवी होळकर स्मारक ठरणार असून वैभवशाली इतिहासाची साक्ष देणारे आहे या स्मारकाच्या पार्श्वभूमीला ऐतिहासिक महेश्वर किल्ला आणि इंदूर राजवाड्याच्या संकल्पनेचा मिलाफ साधणारी २८ फूट उंच आणि ५६ फूट रुंद दगडी भिंत उभारली जाणार आहे. ही भिंत स्मारकाचे विशेष आकर्षण ठरणार आहे. या **पान ३ वर**

## संपादकीय

# सिंध प्रांतात उद्रेक; शरीफ सरकारची डोकेदुखी वाढली

पाकिस्तानातील शरीफ सरकारपुढील आव्हाने कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे. भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिन्दुरने पाकिस्तानची जगभर नाचक्की झाली. भारताने पाकिस्तानात घुसून पाकिस्तानला जो तडाखा दिला त्याने पाकिस्तानची जनता पाकिस्तानच्या शहाबाज शरीफ सरकारवर चिडून आहे. त्यात पाकिस्तानच्या बलुचिस्तानमध्ये स्वतंत्र बलुचिस्तानसाठी बलुचिस्तानी नागरिकांनी सरकारविरोधात एल्गार पुकारून सरकारला आवाहन दिले आहे. बलुच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानी लष्कराविरुद्ध लढा पुकारून स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणा देखील केली. सीमेवर भारतीय लष्कराशी आणि सीमेच्या आत बलुचिस्तान लीबरेशन आर्मीशी लढताना पाकिस्तान अक्षरशः भिकेकंगाल झाला आहे. पाकिस्तानची अर्थव्यवस्था रसातळाला गेल्याने पाकिस्तान जगात भिकेचा कटोरा घेऊन फिरत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला निधी दिला असला तरी त्यासाठी अनेक अटी घातल्या आहेत. पाकिस्तानात महागाई इतकी वाढली आहे की पाकिस्तानी नागरिकांना एकवेळचे जेवण मिळणे देखील मुश्किल झाले आहे. महागाईने जनता मेटाकुटीला आली आहे. त्यात भारताने सिंधू जल करार स्थगित केल्याने पाकिस्तानी नागरिकांवर पाण्यासाठी वणवण फिरण्याची वेळ आली आहे. जर भारताने हा जल करार पूर्ववत केला नाही तर भविष्यात पाकिस्तानात मोठी पाणीबाणी निर्माण होऊ शकते यावर तोडगा म्हणून पाकिस्तानच्या शरीफ सरकारने ग्रीन पाकिस्तान इनिशीएटीव्ह हा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. सुमारे साडेतीन हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प चीनच्या मदतीने पकिस्तान साकारनार आहे. या प्रकल्पास पाकिस्तानची दुसरी हरित क्रांती संबोधली जातेय. या प्रकल्पाअंतर्गत पाकिस्तानातील चेलिस्तान वाळवंटातील सुमारे ४८ लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे. त्यासाठी शेकडो किलोमिटरची सहा कालवे काढण्यात येणार आहे. या प्रकल्पाकडे पाकिस्तान सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून पाहण्यात येत आहे मात्र हाच प्रकल्प आता पाकिस्तानसाठी डोकेदुखी बनला आहे कारण या प्रकल्पाने सिंध प्रांतात येणारे पाणी पंजाब प्रांतात वळवले जाईल असे सिंध प्रांतातील नागरिकांना वाटते. आपल्या हक्काचे पाणी पंजाब प्रांताला मिळणार असल्याने सिंध प्रांतातील नागरिक प्रचंड अस्वस्थ आहेत या अस्वस्थतेतूनच तेथील नागरिक रस्त्यावर उतरून पाकिस्तान सरकारविरुद्ध आंदोलन करत आहेत. भारत आणि बलुचिस्तान आर्मी पुढे हतबल झालेल्या शरीफ सरकारपुढे ही नवी डोकेदुखी उभी ठाकली आहे. पाकिस्तानातील सिंध प्रांतातील लोक आता सरकारच्या विरोधात रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहेत. या आंदोलनाला हिंसक वळण देखील लागले आहे. संतप्त आंदोलकांनी सिंध प्रांतातील गृहमंत्र्यांच्या घराला आग लावली. यावेळी झालेल्या गोळीबारात तीन नागरिकांचा मृत्यू झाला. हे आंदोलन वाढतच चालले आहे. पाकिस्तान लष्कर आणि सरकारमध्ये पंजाबचे वर्चस्व असून त्यांचे सिंधच्या विकासाकडे वर्षानुवर्ष दुर्लक्ष होत असल्याची तेथील नागरिकांची तक्रार आहे. पाकिस्तान सरकार सिंध प्रांतावर कायम अन्याय करीत असल्याची भावना तेथील नागरिकांची झाली आहे. या अन्यायाविरोधात सिंध प्रांतातील नागरिक आवाज उठवत आहेत. इतकेच नाही तर या आंदोलनात सिंध प्रांतातील नागरिकांनी स्वतंत्र सिंधू देशाची मागणी केली आहे. ही मागील आताच नव्हे तर मागील काही वर्षांपासून करण्यात येत आहे. पाकिस्तानातील सिंध प्रांतात हिंदू धर्मीय नागरिक मोठया प्रमाणात राहतात. या नागरिकांवर गेल्या काही वर्षांपासून अन्यायाची मालिका सुरू असून ही अन्यायाची मालिका संपावी आणि सिंध प्रांतातील हिंदू नागरिकांना त्यांचे अधिकार आणि हक्क प्राप्त व्हावेत यासाठी जगभरातून या आंदोलनाला पाठिंबा मिळत आहे. मागील काही काळात पाकिस्तानातील हिंदू महिलांवर विशेषतः सिंधी हिंदू महिलांवरील अत्याचाराच्या घटनांत कमालीची वाढ झाली आहे. या भागातील मुलींचे, महिलांचे फसवून, पळवून, सक्तीने धर्मांतर केले जात आहे. वाढत्या अत्याचारामुळे येथील नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. वारंवार सरकारला विनंती करूनही सरकार त्याकडे दुर्लक्ष करत असल्याने तेथील नागरिक अस्वस्थ होते त्यातच या नव्या प्रकल्पाची भर पडल्याने तेथील नागरिकांची अस्वस्थता आणखी वाढली. आपल्यावर होणारा अन्याय दूर करायचा असेल तर स्वतंत्र सिंधू देशाशिवाय पर्याय नाही अशीच भावना तेथील नागरिकांची झाली आहे त्यातूनच स्वतंत्र सिंधू देशाची मागणी करण्यात आली. मागील वर्षीच स्वतंत्र सिंधू देशाला भारत आणि अमेरिकेने पाठिंबा द्यावा अशी विनंती करण्यात आली होती. त्यावर दोन्ही देशांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नसली तरी भविष्यात या दोन्ही देशांना आंदोलनकर्त्यांच्या या मागणीची दखल घ्यावीच लागेल आणि जेंव्हा हे दोन्ही देश या मागणीची दखल घेतील तेंव्हा पाकिस्तानची आणखी शकले झालेली असतील.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# डोनाल्ड ट्रम्प विश्वासघाती; मित्र राष्ट्रांना केव्हाही देवू शकतात धोका!



अमेरिका सध्याच्या परिस्थितीत स्वार्थी बनल्याने दिसून येते.अमेरिकेने युक्रेन,अफगाणिस्तान सारख्या अनेक राष्ट्रांना लहुलोहान करून सोडले आहे व त्यांची मदत करण्याचे सोडून त्यांना धोका देण्याचे काम करीत आहे आणि हेच काम व्यापार आणि टेरिफच्या बाबतीतही करीत आहे.त्याचप्रमाणे पाकिस्तानच्या बाबतीत भारताला धोका देवून सध्याच्या परिस्थितीत डोनाल्ड ट्रम्प पाकिस्तानला सर्वोतोपरी मदत करून संपूर्ण लाड पुरवित आहे व आतंकवाद्यांना मागच्या दरवाजाने खतपाणी घालत असल्याचे दिसून येते.म्हणजेच अमेरिका बोलतो एक आणि करतो वेगळेच त्यामुळे अमेरिकेपासुन भारताला सावध रहाने गरजेचे आहे.

२२ एप्रिल २०२५ ला पहलगाममध्ये पर्यटकांवर आतंकवाद्यांनी हल्ला करून २८ निरअपराधांची हत्या केली होती.त्याचा बदला भारताने मोठ्या शिताफीने घेतला व पाकिस्तानमध्ये घुसून आतंकवाद्यांचे ९ कॅम्प उध्वस्त केली व शेकडो आतंकवाद्यांचा सफाया केला सोबतच अनेक पाकिस्तानी सैनिक सुध्दा मारल्या गेलेत.आतंवाद विरोधी भारताची कठोर भुमिका पहाता पाकिस्तानने शेकडो मिसाईल भारतावर डागण्याचा प्रयत्न केला. परंतु पाकिस्तानचे संपूर्ण मिसाईल भारतीय सेनेने निष्क्रिय करून त्याची औकात त्याला दाखवली. पाकिस्तानची मिसाईल कारवाई पहाता भारताने सुध्दा पलटवार केला व पाकिस्तानमध्ये १०० किलोमीटर अंदर घुसून पाकिस्तानचे एअर बेससह अनेक ठिकाणे उध्वस्त करून अनेक आतंकवादी ठीकाणे जमीनदोस्त केले.भारताची कठोर कारवाई पहाता पाकिस्तान आपोआप घुटण्यावर आला व युद्ध बंदीची भिक डोनाल्ड ट्रम्पच्या माध्यमातून भारताला मागायला लागला व भारताने आपल्या शर्तीवर युद्ध विराम केले आणि खडसावून सांगितले की यानंतर आतंकवाद्यांकडुन एकजरी गोळी चालली तर भारताकडून आगीचे गोळे टाकण्यात येईल.भारताने पाकिस्तान,अमेरिकासह जगाला स्पष्ट शब्दात ठनकाऊन सांगितले की जोपर्यंत आतंकवाद खत्म होत नाही तोपर्यंत ऑपरेशन सिन्दुर सुरूच राहील.परंतु ज्या पाकिस्तानमध्ये आतंकवाद्यांची फॅक्टरी आहे व अमेरिकेवर हल्ला करणारा मास्टर माईंड ओसामा बिन लादेन याने अमेरिकेला वर्ल्ड ट्रेड सेंटर सारख्या मोठ्या जखमा देवुन आगीत लोटले होते व यात ३ हजारपेक्षा अधिक लोकांचा बळी गेला होता.नंतर अमेरिकेने ओसामा बिन लादेनला पाकिस्तानमध्ये घुसून मारले होते. एवढे सर्व असतांना आज अमेरिका पाकिस्तानचे गुण गातो व सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन सुध्दा देत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.अमेरिका नेहमी प्रमाणे आताही दोगली नितीचा वापर करीत आहे.भारत-पाक संघर्ष सुरू असतांनाच आय.एम. एफ.ने पाकिस्तानला ताबडतोब १ अरब अमेरिकन डॉलरची मदत केली आणि हे कर्ज देण्याचे काम अमेरिकेच्याच मदतीने झाले आहे.आय.एम.एफ.चे पुर्वीचे कर्ज अजुनपर्यंत पाकिस्तानने चुकविले नाही तरीही त्याला कर्ज देण्यात आले यावर भारत सरकारने नाराजी सुध्दा व्यक्त केली आहे. कारण पाकिस्तानला मिळणारे ८० टक्के कर्जाचा पैसा हा आतंकवादी संघटनांना दिला जाणार आहे. आज भारताची सैन्य शक्ती,ब्रम्होस सारखे अत्याधुनिक मिसाईल पाहून अमेरिका, चीन व तुर्की तिलमिला झाल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत भारताची जगात वाढती ताकद पहाता पाकिस्तानच्या मदतीला अमेरिका, तुर्की व चीन खुलेआम उभा असल्याचे दिसून. त्यामुळे आज अमेरिका विश्वास पात्र देश रहाला नसुन एक गद्दार देश बनला आहे.तुर्कीतील भुकंप काळात भारत सर्वप्रथम धावुन गेला व सर्वोतोपरी मदत सुध्दा केली.

परंतु आज तुर्की सुध्दा पाकिस्तानच्या बाजूने आहे.त्यामुळेच भारतीयांनी तुर्कस्तानच्या पर्यटनावर बहिष्कार टाकला आहे जेणेकरून त्याची औकात त्याला समजायला हवी.आपला खरा मित्र व विश्वास पात्र देश म्हणजे फक्त रशिया हेही तितकेच सत्य आहे.गेल्या ७८ वर्षांचा इतिहास आहे की अमेरिकेने भारतापेक्षा पाकिस्तानलाच सर्वोतोपरी मदत केली आहे.त्यामुळे भारताने डोनाल्ड ट्रम्प पासून सावध राहने अत्यंत गरजेचे आहे.पाकिस्तान हा आतंकिस्तान आहे त्यामुळे त्याची प्रगती तर होऊच शकत नाही. उलट त्याचे अनेक तुकडे-तुकडे होण्याची दाट शक्यता आहे.ज्याप्रमाणे पाकिस्तानपासुन बांगलादेश वेगळा झाला.त्याच धर्तीवर आज पाकिस्तानमधील अनेक प्रांत पाकिस्तान सोबत रहाण्यास तयार नाहीत. सध्याच्या परिस्थितीत सिंध प्रांत व व बलुचिस्तान उठावाच्या दिशेने वाटचाल करीत आणि हे दोन्ही प्रांत पाकिस्तानसाठी बाभळीचे काटे बनणार आहे ही बाभळीचे काटे पाकिस्तानला एवढ्या जखमा देवुन जाईल की तो मरेपर्यंत कधीच विसरणार नाही जैसी करणी वैसी भरणीहेही तितकेच सत्य आहे. सध्याच्या परिस्थितीत पाकिस्तानमध्ये गृहयुद्ध भडकल्याचे दिसून येते आणि त्याचे चित्र सिंध प्रांतात पहायला मिळत आहे.पाकीस्तानमध्ये गृहमंत्र्याचे घर जाळले, महामार्गावर मोठ्या प्रमाणात लुटपाट सुरू आहे, सिंधू कालवा प्रकल्पावरून आंदोलन हिंसक झाले आहे,या संघर्षात दोघांचा मृत्यू झाला असून पोलिसांसह अनेक जण जखमी झाले आहेत.संतप्त आंदोलक बिनधास्त अत्याधुनिक बंदुकांसह रस्त्यावर उतरले आहेत.त्यामुळे ही संपूर्ण परिस्थिती पाकिस्तानच्या आवाक्या बाहेर जातांना दिसत आहे. तर दुसरीकडे पाकिस्तानच्या अशांत बलुचिस्तान प्रांतात स्कूल बसवर करण्यात आलेल्या आत्मघातकी हल्यात तीन बालकांसह पाच जणांचा मृत्यू झाला व ३८ जण जखमी झाले. अशा पाकिस्तानमध्ये त्यांचेच बंधू आतंकवादी कारवाया करीत आहे तर दुसरीकडे पाकिस्तानची जणता पाकिस्तान सरकारला त्रासल्यामुळे मोठा उठाव करण्याच्या तयारीत आहे.म्हणजेच पाकिस्तान जेवढे पाप करीत आहे त्याच्या दुप्पट त्याला यातना सुध्दा भोगाव्या लागत आहे.अशा परिस्थितीत अमेरिकेने जर पाकिस्तानला मदत केली तर कालांतराने अमेरिका न घरका ना घाट काअशी परिस्थिती येवू शकते.



भारतात ज्योती मल्होत्रा सारखे अनेक गद्दार आहेत ते पाकिस्तानसाठी जासुसी व हेरगिरी करीत आहेत. अशाच्या मुसक्या सरकारने ताबडतोब आवळल्या पाहिजे व यांना कठोर शिक्षा ठोठावली पाहिजे.इतिहास सांगतो आपल्या घरात कोणी ना कोणी गद्दार असतो यालाच म्हणतात घर का भेदी लंका ढाये आणि यामुळेच पहलगाम हत्याकांड झालेला आहे. त्यामुळे ज्योती मल्होत्रा सारखे अनेक राहु शकतात की ते पाकिस्तानसाठी हेरगिरी करीत असतील अशांना सुरक्षा विभाग जागीच ठेचले पाहिजे. त्याचप्रमाणे राजकीय पुढाऱ्यांनो लक्षात ठेवा ऑपरेशन सिन्दुर देशाच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे त्यामुळे यावर कोणत्याही प्रकारचे राजकारण होणार नाही याची जातीने काळजी घ्यावी आणि हेरगिरी किंवा अन्य गद्दारांना सजा देण्यासाठी सहकार्य करावे.कारण गद्दारांना माफी नकोच. भारतीय सेनेला माझा कोटी-कोटी सलाम जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# बालपणीचे ते रम्य दिवस पुन्हा येतील का?

मोठं झाल्यावर कधी कधी बालपणीचे ते रम्य दिवस आठवतात. तेव्हा नकळत आपले मन भूतकाळात प्रवेश करते आणि बालपणीच्या त्या रम्य आठवणींना उजाळा मिळतो. बालपणाचा प्रवास आपण कशाप्रकारे पार पाडला? बालपणी आपण काय काय केलो? बालपणीचे ते मित्र व मैत्रीणी यांच्या सहवासात आपण बालपण कसे घालवले? त्यांच्यासोबत आपण कोणकोणते खेळ खेळलो? बालवाडीत शिकायला गेल्यावर आपण काय काय शिकलो? बालवाडीतील मित्रांसोबत काय काय गप्पा गोष्टी केल्या? बालपणी आई-वडिलांनी आपल्यावर कोणकोणते संस्कार टाकले? हे सगळे प्रश्न आपल्याला जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर नकळत पडतात आणि आपल्याला भूतकाळात घेऊन जातात. आणि भूतकाळातील रम्य आठवणी ताज्या होतात. तेव्हा आपले मन या रम्य आठवणींनी काही वेळ स्तब्ध होते.आपल्या मनात अनेक विचारांचा पाऊस थैमान घालतो. तेव्हा आपल्याला हे विचार हळूच सांगून जातात की, बांधवांनो, हे रम्य बालपण पुन्हा येणे नाही. बालपणीचे ते निरागस व निष्पाप मित्र जीवनात पुन्हा येणे नाही. कारण बालपणी आपले मन एवढे स्वच्छ आणि सुंदर असते की, त्या बालमनात कसलीच घाण व कसलेच कपट नसते. बालवयात माणसाचे मन अगदी खुल्या किताब सारखे असते. भलेही बालवयात माणसाला तेवढ्या भावना व समज नसते पण बालवयात झालेली मैत्री ही आयुष्यभर टिकणारी असते.कारण बालपणी माणसाचे मन अगदी मेणासारखे लवचिक असते. त्याला आपल्या मनाप्रमाणे आकार देऊन घडवता येते. घरातील आई-वडील किंवा जेष्ठ मंडळी जसे बोलतील, जसे वर्तणूक करतील आणि जसे संस्कार टाकतील, तसे त्या मुलावर संस्कार पडत असतात. म्हणून प्रत्येकाचे बालपण हे खूप आणि खूप महत्त्वाचे असते. बालपणी मित्रांसोबत आपले दररोज खेळण्यावरून भांडण होते. आपण एकमेकांना मारून घेतो आणि लगेच झालेले भांडण विसरून एकमेकांना बोलतो. जणू तुझे माझे जमेना आणि तुझ्या वाचून करमेना अशी गत आपली होऊन जाते. कारण बालवयात माणसाचे मन एवढे शुद्ध आणि बावनकशी सोने असते की, त्या मनात कोणाबद्दल राग, द्वेष, कपट, खुन्नस आणि वैर या कसल्याच शब्दांना थारा नसतो. अगदी निरागस, निष्पाप व निष्कपट त्याचे मन असते. म्हणूनच की काय? बालपणी झालेल्या सर्व चुका माफ केल्या जातात. म्हणून बालपण हे प्रत्येकाच्या जीवनातील खूप महत्त्वाचा टप्पा आहे. बालपण आठवले की, वाटते बालपणीचे ते रम्य दिवस पुन्हा येतील का? बालपणीचे ते निस्वार्थ व निष्कपट मित्र पुन्हा भेटतील का? ते तणावमुक्त, बेजबाबदार व मनमानी जीवन जगायला आता मिळेल का? हे प्रश्न आता मला मोठं झाल्याच्या नंतर राहून राहून पडतात. कारण बालवयात आपल्यावर कोणत्याच जबाबदारीचे ओझे नसते. कोणत्याच गोष्टीचा ताण तणाव नसतो. तेव्हा आई वडिलांच्या जीवावर भरपेट खाऊन मनसोक्त हिंडायला बरे वाटायचे. मित्रांसोबत लपंडाव, विटी दांडू व शिवनापाणी असे विविध प्रकारचे खेळ खेळायला खूप मजा यायची. मित्रांसोबत रानावनात फिरून आंबे, सिताफळ, बोरं व कारं खाण्यात जो आनंद मिळायचा तो अवर्णनीय होता. आजीने सांगितलेल्या गोष्टी ऐकत आजी जवळ झोपायला मस्त वाटायचे. आई सोबत शेतात जाऊन आईला शेतीच्या कामात मदत करणे, तिला जळण फाटा गोळा करू लागणे, गोवऱ्या वेचू लागणे अशी कामे करायला बालपणी खूप उत्साह वाटायचा. आणि मन प्रफुल्लित होऊन आनंदाने थुई थुई नाचायचे. पण आता मोठं झाल्यावर या गोष्टी पुन्हा करायच्या म्हटले तरी बालपणी या गोष्टीतून जेवढा आनंद मिळायचा तो आता मोठेपणी मिळणे शक्य नाही. म्हणून प्रत्येकाला बालपणीचे ते रम्य दिवस आठवणे अनिवार्य आहे. म्हणूनच अनेक कवींनी व साहित्यिकांनी बालपणावर भरभरून लिहिले आहे. आणि बालपणाचे महत्त्व विशद केले आहे. कारण त्यांना माहीत होते की, जीवनात सगळ्या गोष्टी परत मिळवता येतील पण गेलेली वेळ आणि बालपणीचे दिवस परत कधीच मिळवता येत नाहीत.म्हणून त्यांनी बालपणावर काहीतरी लिहून मनमोकळे करण्याचा प्रयत्न केला आहे. तसाच हा माझा देखील छोटासा प्रयत्न आहे. आणि मला देखील पुन्हा पुन्हा तेच वाटत आहे की, बालपणीचे ते रम्य दिवस पुन्हा येतील का?



**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## पाकिस्तानी विमानांसाठी हवाई हद्द बंदची मुदत भारताने वाढविली

**दिल्ली -** जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याला आता एक महिना पूर्ण झाला आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली होती. यानंतर भारताने ६ आणि ७ मे रोजी रात्री ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिलं. तसेच भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवाद्यांच्या तळांना उद्ध्वस्त केलं. त्यामुळे दोन्ही देशातील तणाव मोठ्या प्रमाणात वाढला होता. पण त्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी झाली आणि दोन्ही देशातील तणाव काहीसा कमी झाल्याची परिस्थिती पाहायला मिळत आहे. पण असं असलं तरी भारत पाकिस्तानच्या विरोधात आणखी कडक पावलं उचलत असल्याचं पाहायला मिळत आहे. आता भारताने पाकिस्तानी विमानांसाठी आपली हवाई हद्द बंदची मुदत जूनपर्यंत वाढवली आहे. या निर्णयानुसार पाकिस्तानी विमान कंपन्यांना भारतीय हवाई हद्दीत प्रवेश करण्यास मनाई असेल. भारताने पाकिस्तानी विमानांना भारताच्या हवाई क्षेत्राचा वापर करण्यावरील बंदी एका महिन्यासाठी वाढवल्यामुळे याचा फटका पाकिस्तानी विमान कंपन्यांना बसणार आहे. यामध्ये पाकिस्तानी विमान कंपन्या आणि त्यांच्या चार्टर्ड नागरी किंवा लष्करी विमानांवर देखील बंदी असणार आहे. ही बंदी २३ मे ते २३ जून २०२५ पर्यंत लागू असणार आहे. संदर्भातील निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

## विद्यार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वेळेत उपलब्ध होण्यासाठी 'दाखला आपल्या दारी' उपक्रम

**जालना -** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ या कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी इयत्त १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशासाठी लागणारे आवश्यक प्रमाणपत्रे विहित वेळेत मिळण्यासाठी दाखला आपल्या दारी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. नुकतेच इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशासाठी लागणारे आवश्यक प्रमाणपत्रे उदा. वय अधिवास व रहीवास प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, रहीवासी प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना वेळेत मिळण्यासाठी व प्रवेश सुरु झाल्यावर होणारी संभाव्य गर्दी टाळण्यासाठी दाखला आपल्या दारी हा उपक्रम जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत दि. २६ ते २७ मे, २०२५ पर्यंत राबविण्यात येणार असल्याचे उपजिल्हाधिकारी सा. प्र. यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणकर्त्या महिलेचा आत्मदहनाचा प्रयत्न

### पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला; माजी आ. गोरंट्याल यांनी दिली भेट

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणकर्त्या महिलेने आत्मदहनाचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला आहे. रोहिणी हरिभाऊ मिरकुट असं आत्मदहनाचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे नाव आहे. रोहिणी यांचे पती हरिभाऊ मिरकुट यांच्या नावावर असलेली ४ एकर जमीन शासनाच्या भूसंपादन प्रक्रियेत गेली आहे. मात्र, प्रशासनाने मिरकुट यांची ४ एकर ऐवजी ८ एकर जमीन भूसंपादनात घेतली आहे. त्यामुळे न्याय मिळावा या मागणीसाठी हरिभाऊ मिरकुट, त्यांच्या वडील आणि पत्नीसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. मात्र, मिरकुट कुटुंबाच्या उपोषणाची प्रशासनाने अद्याप पर्यंत दखल घेतली नाहीये. त्यामुळे उपोषणकर्त्या रोहिणी मिरकुट यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच आत्मदहनाचा प्रयत्न केला. यावेळी त्यांनी आपल्या अंगावर ज्वलनशील पदार्थ ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न केला. मात्र, यावेळी उपस्थित पोलिसांनी रोहिणी यांना वेळीच आवरल्याने मोठ्या अनर्थ टळला आहे.

दरम्यान हा सर्व प्रकार घडत असताना जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी सदरील महिलेची भेट घेऊन महिलेकडून प्रकरणाची संपुर्ण हकीकत जाणून घेतली. त्यानंतर थेट जिल्हाधिकाऱ्यांना मोबाईलवर सदरील घटनेची माहीती देऊन या घटनेचा तपशिल तपासून योग्य ती कारवाई करण्याची विनंती करून गोरंट्याल यांनी महिलेची समजूत काढून लवकरच योग्य तोडगा निघेला असे अश्वासन दिले.



## सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाच्या ठिकाणी भारताच्या विजयासाठी 'शतचंडी यज्ञ' आरंभ



**फोंडा, गोवा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवलेनगरी)** - काश्मीरमधील पहलगाम येथे घडलेल्या अतिरेकी आक्रमणानंतर भारताने दिलेल्या जोरदार प्रत्युत्तरानंतर युद्धविरामाचे औपचारिक निवेदन झाले असले, तरी पाकिस्तानकडून छुप्या स्वरूपातील कुरापती आणि कारवाया अजूनही सुरुच आहेत. अशा परिस्थितीत भारताचा विजय व्हावा आणि पृथ्वीवरील एकमेव सनातन राष्ट्र असलेल्या भारताचे रक्षण व्हावे, यासाठी सनातन संस्थेच्या वतीने फर्मागुडी, फोंडा, गोवा येथील 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'च्या पावन भूमीत २० ते २२ मे २०२५ या कालावधीत त्रिदिनी 'शतचंडी यज्ञा'चे आयोजन करण्यात आले आहे. या यज्ञाचा प्रारंभ विधिपूर्वक करण्यात आला आहे.

या यज्ञाचे यजमानपद दांपत्य सद्गुरु नीलेश सिंगबाळ आणि सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ, तसेच सद्गुरु डॉ. मुकुल गाडगीळ अन् सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ या भूषवत आहेत.

यज्ञाच्या प्रारंभी श्रीगणेशपूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन, नांदीश्राद्ध यांसह वास्तूमंडल देवतांचे आवाहन, पूजन व अन्य धार्मिक विधीने करण्यात आले. त्यानंतर प्रधान देवतांचे आवाहन आणि पूजन झाल्यानंतर पंचाक्षरी होमाची दिव्य प्रक्रिया संपन्न झाली. हा शतचंडी यज्ञ शिवागम विद्यानिधी आगमाचार्य श्री. अरुणकुमार गुरुमूर्ती आणि गुरुमूर्ती शिवाचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत असून यज्ञविधी करताना पुरोहितांनी यज्ञाचे महत्व स्पष्ट करत सांगितले की, सर्व देवतांचे तेज, शक्ती आणि कृपा ही चंडीरूपातच एकत्रित प्रकट होते. म्हणूनच श्रीचंडीदेवीला 'महिषासुरमर्दिनी' म्हणून ओळखले जाते. अष्टदशभुज महालक्ष्मी हेही तिचे एक रूप असून, ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रिदेवतांच्या शक्तीचे साक्षात् मूर्तिमंत स्वरूप म्हणजे श्री चंडीदेवी. त्यामुळे चंडी होमामध्ये समस्त पूजांचे परिपूर्णत्व सामावलेले आहे.

## कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिम अंतर्गत राज्यस्तरावर जालना जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र प्रथम क्रमांकावर

**जालना । प्रतिनिधी** - महाराष्ट्र शासनाने क्षेत्रीय कार्यालयातील सुधारणा कार्यक्रमाच्या १०० दिवसीय कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील सर्व विभागातील जिल्हास्तरीय क्षेत्रीय कार्यालयाच्या कामकाजाचे मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद (क्युसीआय) यांचेकडून करण्यात आले होते. या मूल्यमापनामध्ये जालना जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राने राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे, ही बाब जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.

१०० दिवसीय कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमे अंतर्गत जालना जिल्हा कार्यालयामार्फत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. शासन निर्णयानुसार, क्षेत्रीय कार्यालयांना १०० दिवसांचा १० कलमी महत्वकांशी कृती कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले होते. या कृती कार्यक्रमांतर्गत पुढील मुद्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले संकेतस्थळाचा विकास व अद्ययावत माहिती उपलब्ध करणे, नागरिकांचे जीवनमान सुकर करण्यासाठी उपाययोजना, स्वच्छता व कार्यालयीन परिसराचे व्यवस्थापन, जनतेच्या तक्रारींचे वेळेवर व प्रभावी निराकरण, कार्यालयातील सुविधा व सोयींचा स्तर उंचावणे, गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी प्रसार व प्रोत्साहन, क्षेत्रीय कार्यालयांना प्रत्यक्ष भेटी व आढावा, ई-ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी या सर्व घटकांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळेच या कार्यालयाने राज्यस्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या उल्लेखनीय यशासाठी कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनिषा वर्मा, नितीन पाटील, आयुक्त कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मुंबई, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, उप आयुक्त, आयुक्तालय मुंबई, डी.डी. पवार, उप आयुक्त विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर विद्या शितोळे, यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालनाचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांच्या मार्गदर्शनाखाली भुजंग रिठे, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, सुरेश बहुरे, आत्माराम दळवी, डॉ. अमोल परिहार, अमोल बोरकर, प्रदिप डोळे, रविंद्र पाडमुख, विशाल जगरवाल, सुभाष पंडीत, उमेश कोल्हे, दिनेश उढाण, सोमेश्वर शिंदे, निर्मल बिडकर, दिपक पालवे, अमर तुपे यांचे सहकार्य लाभले आहे.



## मुंबई विद्यापीठाच्या प्रवेशपूर्व ऑनलाईन नाव नोंदणीस मुदतवाढ

**मुंबई** - राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त शिक्षण संस्था आणि विद्यापीठातील शैक्षणिक विभागामध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी पदवीच्या ३ आणि ४ वर्षीय अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशपूर्व ऑनलाईन नाव नोंदणीस मुदतवाढ देण्यात आली आहे. सुधारीत वेळापत्रकाप्रमाणे आता विद्यार्थ्यांना २६ मे पर्यंत प्रवेशपूर्व ऑनलाईन नाव नोंदणी करता येणार आहे.

## कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीमेत जालना उप प्रादेशिक परिवहन कार्यालय राज्यामध्ये द्वितीय




**जालना । प्रतिनिधी** - शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवून योजनांचा लाभ उपलब्ध करून देत शासन-प्रशासन व नागरिकांमधील विश्वास वृद्धिंगत होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम राज्यस्तरावर राबविण्यात आली. या मोहिमेतील दूसऱ्या टप्प्यात सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना यांनी कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमे अंतर्गत राज्यात द्वितीय क्रमांक पटकाविला आहे.

राज्य शासनामार्फत प्रशासकीय कामकाजात गतीशिलता, पारदर्शकता आणि लोकाभिमुख सेवांचे वितरण यासाठी '१०० दिवस कार्यालयीन सुधारणा कार्यक्रम' राबविण्यात आला होता. यामध्ये कार्यालयीन कामकाजात नवकल्पना व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, विहित वेळेत सेवा वितरण, ई-ऑफिसची अंमलबजावणी, डिजिटलायझेशन व कागद विरहित कार्यालयीन कामकाज, नागरिकांच्या तक्रारींचे जलद निराकरण, कार्यसंस्कृती सुधारणा अंतर्गत प्रशिक्षण अशा विविध बाबींच्या अनुषंगाने मूल्यमापन करण्यात आले. या बाबींमध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना यांनी उत्तम कामगिरी केली.

या उपक्रमासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी मर्यादित वेळेत विशेष काम करुन हे यश संपादन केल्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेतील तरतूदीमध्ये सुधारणा

**जालना । प्रतिनिधी** - राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी सर्जनशीलतेला कालानुरूप वाव देणारी सर्वसमावेशक मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) ही योजना दिनांक १ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. तसेच दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सदर योजनेमध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्राच्या सर्व विभागात प्रभावीपणे व्हावी व योजनेअंतर्गत जास्तीत-जास्त युवक-युवतींना सहभाग घेऊन जास्तीत-जास्त यशस्वी उद्योजक निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातून योजनेच्या शासन निर्णयामध्ये कालानुरुप बदल करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सुकाणू समितीने केलेल्या शिफारशीनुसार, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेतील तरतुदींमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

यामध्ये प्रकल्पाची कमाल मर्यादा वाढली असुन, आता उत्पादन क्षेत्रातील प्रकल्पांसाठी ११ कोटी आणि सेवा व कृषी पूरक व्यवसायांसाठी रु.५० लाख पर्यंत कर्ज मिळवण्याची संधी प्राप्त झाली आहे. खेळत्या भांडवलाची मर्यादा देखील वाढली असुन यामध्ये सेवा उद्योगांसाठी आता प्रकल्प खर्चाच्या ६०% आणि उत्पादन उद्योगांसाठी ४०% पर्यंत खेळत्या भांडवलासाठी निधी उपलब्ध होणार आहे. नवीन व्यवसायांचा समावेश कुक्कुटपालन, अंडी उबवणी केंद्र, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, हॉटेल ढाबा (शाकाहारी/मांसाहारी), होम-स्टे. क्लाऊड किचन, जलक्रीडा, मासेमारी, प्रवासी वाहतुकीकरिता बोट व्यवसाय या योजनेतंर्गत पात्र असतील. तसेच शैक्षणिक पात्रतेत देखील शिथिलता देण्यात आली असून, आता १० लाखांवरील उत्पादन प्रकल्पांसाठी आणि ५ लाखांवरील सेवा व कृषी पूरक व्यवसायांसाठी आता फक्त ८ वी पास असणे आवश्यक असणार आहे. या योजनेकरीता आता वयोमर्यादेचे बंधन राहणार नाही. आता १८ वर्ष पूर्ण झालेल्या कोणत्याही स्थानिक रहिवाशाला या योजनेचा लाभ घेता येणार आहे. तसेच निवासी/ऑनलाईन उद्योजकीय प्रशिक्षण निवड करण्याची मुभा देखील यामध्ये असणार आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता प्राप्त १ हजार ३०० प्रकरणांचे उद्दिष्ट पूर्तीसाठी ग्रामीण व शहरी तरुणांनी जास्तीत-जास्त अर्ज योजनेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरावे. (www.maha-cmegp.gov.in) तसेच जिल्ह्यातील सर्व बँक व्यवस्थापक यांनी छाननी करून संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या कर्ज प्रस्तावांना त्वरित कर्ज मंजुरी देऊन उद्दिष्ट पूर्तीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सारणीकर यांनी केले आहे.

## लोकशाही दिनाचे २ जुन रोजी आयोजन

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक २ जून २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊनदेखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्वी, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनात द्यावयाच्या अर्जाचा विहित नमुना http://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील फ्रुट मार्केट हटवावे- ॲड. महेश धन्नावत

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर चारही बाजूने फळ विक्रेत्यांनी घेरला असून, या ठिकाणी वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. ही बाब विचारात घेता, तेथील फळ मार्केट त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ॲड. महेश धन्नावत यांनी महानगर पालिकेच्या आयुक्तांकडे केली आहे.

या संदर्भात ॲड. धन्नावत यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्य शासनाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे सुशोभीकरण सुरू आहे. मात्र, स्मारकाच्या चारही बाजूने फळ विक्रेते बसत आहेत. हातगाड्या लावत आहेत. यामुळे स्मारक परिसरात नागरिकांची अनावश्यक गर्दी, वाहतुकीची अडचण आणि अस्वच्छता निर्माण होत आहे. स्मारकाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचत असल्याचे ड. धन्नावत यांनी नमूद केले आहे. हा परिसर शिवाजी महाराजांचे स्मारकस्थळ असल्याने तो नेहमी स्वच्छ, शांत आणि आदरयुक्त ठेवला पाहिजे. मात्र, सध्या तेथे अनधिकृत फ्रुट मार्केटमुळे अव्यवस्था निर्माण झाली आहे. त्यामुळे हे मार्केट तातडीने इतरत्र हलवावे, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाची प्रत जिल्हाधिकाऱ्यांनाही देण्यात आली आहे.

### पान १ वरुन

#### परतूर शहरातील ...

यावेळी त्यांनी नमूद केले

यावेळी उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार डॉ प्रतिभा गोरे, मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे, मजीप्रा चे कार्यकारी अभियंता श्री चव्हाण मंठा परतूर चे गटविकास अधिकारी राजेश तांगडे, जालना गटविकास अधिकारी संदीप पवार महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी श्री कोळेकर, लोकप्रतिनिधी शत्रुघ्न कणसे नितीन राठोड विक्रम उफाड बद्रीनारायण ढवळे दया काटे प्रवीण सातोणकर संदीप बाहेकर प्रकाश चव्हाण कृष्णा आरगडे सावता काळे सुरेश काळे नरेश कांबळे यांच्यासह प्रशासनातील विविध विभागांच्या विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

#### जनतेच्या हितासाठी ...

सोपान पेंढारकर, चंपालाल भगत, सर्जेराव जाधव, अर्जुन गेही, धनराज काबलिये, कपिल दहेकर, संध्याताई देठे, शुभांगीताई देशपांडे, अरुणाताई जाधव, सखुबाई पणबिसरे, स्नेहा जोशी, सुषमा खरात, शारदा काळे, सुनील खरे, संजय डोंगरे, प्रदीप पवार, रवींद्र अग्रवाल, दिपक ठाकूर, सुनील पवार आदीसह सर्व मोर्चा, नगरसेवक, मंडळ अध्यक्ष, प्रकोष्ट / सेल / आघाडी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

#### धुळे विश्रामगृह ...

केली पाहिजे. तसेच अर्जुन खोतकर यांचं विधानसभेचे सदस्यत्व रद्द केले पाहिजे अशी मागणी गोरंट्याल यांनी करत शुक्रवार (दि.२३) रोजी दुपारी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांना निवेदन दिलं आहे. यावेळी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### शिवकालीन दुर्मिळ ...

विविध प्रकारच्या तलवारी, बंदुका, ढाली, जांबिया, तोफा, कट्यारी, चिलखत, शिरस्त्राण, भाले, कुर्हाडी, त्रिशूल, अंकुश, सिकल, पुरबा इत्यादींचे प्रदर्शन करण्यात आले. याशिवाय छत्रपतींच्या सैन्यातील सरदारांची सचित्र पराक्रमाची माहितीही उपस्थितांना इतिहासाचे प्रत्यक्ष दर्शन घडवणारी ठरली.

#### पुण्यश्लोक अहिल्यादेवी ...

भव्य प्रकल्पासाठी आणि सुशोभीकरणासाठी शासन सकारात्मक असून सर्वतोपरी सहकार्य करेल.

स्मारक समितीचे अध्यक्ष कपील दहेकर म्हणाले,हे स्मारक अहिल्यादेवींच्या कार्याचा आणि त्यांच्या समाजसुधारणेच्या विचारांचा गौरव आहे. यामुळे जालना शहराचे सांस्कृतिक वैभव वाढेल आणि भावी पिढ्यांना प्रेरणा मिळेल. दरम्यान जालना जिल्ह्यात तिरंगा यात्रा समारोप आणि माजी सैनिकांचा सत्कार कार्यक्रमवस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांच्या उपस्थितीत पार पडला.

## एका महिन्यात मुंबई, तर दोन महिन्यात महाराष्ट्र भोंगे मुक्त होणार

### किरीट सोमय्या यांची माहिती



**जालना । प्रतिनिधी** - मुंबईत आता पर्यंत ६० टक्के बेकायदेशीर भोंगे खाली उतरवण्यात आले असून एका महिन्यात मुंबई, तर दोन महिन्यात महाराष्ट्र भोंगे मुक्त होणार असल्याचं सोमय्या यांनी म्हटलय. सोमय्या आज दिनांक २३ शुक्रवार रोजी दुपारी १२ वाजता जालना दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील बोगस जन्म प्रमाणपत्र संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन आढावा बैठक घेतली. त्यांनतर ते माध्यमांशी बोलत होते.

दरम्यान, जालन्याच्या अंबड तालुक्यात १हजार ७६० जन्म प्रमाणपत्र खोट्या पद्धतीने नायब तहसीलदारांनी दिले असून जिल्ह्यातील एकूण ३ हजार ५९५ प्रमाणपत्र परत घेतले जाणार असल्याची माहिती सोमय्या यांनी दिलीय. तसेच जिल्ह्यातील बाकी तहसीलदारांनी दिलेल्या प्रमाणपत्राची देखील चौकशी करण्यात येणार असल्याच सोमय्या म्हणालेत. राज्यात आणि देशात विरोधी पक्षातील नेत्यांचे भोंगे ४ महिने सतत वाजत आहेत. त्यांचे भोंगे वाजू द्या, पण राज्यात बेकायदेशीररित्या मशीदिंवर एकही भोंगा वाजू देणार नाही असा इशाराही सोमय्या यांनी दिलाय.

# पाडळी शिवारात शेती रस्ता करण्याची ग्रामस्थांची मागणी

## गावकऱ्यांच्या वतीने तहसिलदार यांना निवेदन



**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील पारधी पाडळी येथील शिवारात शेतकऱ्यांना शेतात रस्ता करून देण्याची मागणी येतील ग्रामस्थांनी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की मौजे पाडळी पारधी या गावचे पुनर्वसन परतूर वाटूर रोडवर नागापूर पाटीजवळ झालेले आहे. सदरील पुनर्वसन ते जुने पाडळी गाव हें सहा किमी अंतरावर बसलेले आहे. पुनर्वसन येथील शेतकऱ्यांच्या जमिनी या जुन्या गावाजवळ आहेत. जवळपास ५०० ते ६०० एकर जमीन या रस्त्यावर वहिती करणे अवलंबून आहे. गावात जाणारा सहा किमी प्रयन्त शेतरस्ता पूर्ण खराब झाला आहे, त्या पैकी दोन किमी रस्ता झाला आहे. उर्वरित चार किमी रस्ता पूर्णपणे खराब झाला असून मोठमोठे खड्डे पडले आहेत. यामुळे पुनर्वसन येथिल शेतकऱ्यांना आपली शेती वहिती करण्यासाठी रस्ता नसल्याने शेतमाल वाहतून करणे व वाहतूकसाठी अडचणीत येत आहे. पावसाळ्यात रस्ता चिखलमय होत असल्यामुळे शेतकऱ्याचे हाल होत असल्याने पाडळी गावाच्या शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी चार किमी रस्ता त्वरित करुन द्यावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर सरपंच प्रसाद काकडे , उपसरपंच शामराव काळे, ग्रामपंचायत सदस्य सचिन मस्के, भास्कर बोराडे, संदीप मस्के, कुंडलिक मस्के,बाळासाहेब मस्के, रमेश काकडे, वैभव बोराडे, यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या निवेदनाच्या प्रतिलिपी आमदार बबनराव लोणीकर, जिल्हाधीकरी, उपविभागीय अधिकारी परतूर यांना दिल्या आहेत.









हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.